# प्रसिध्दीपत्रक

जा.क्र. पोउप-आ/वाहतूक/ ५४६९/२०२२ पुणे शहर, दिनांक -२७/०७/२०२३

**विषय :- दिनांक- ०१/०८/२०२३ रोजी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त करण्यात येणा-या वाहतूक व्यवस्थेतील बदला बाबत.**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त दिनांक ०१.०८.२०२३ रोजी पुणे शहरातील विविध ठिकाणची स्थानिक मंडळे व राजकीय पक्ष कार्यकर्ते **लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुतळा, सारसबाग, पुणे** या ठिकाणी मिरवणूकीने येऊन पुष्पहार अर्पण करीत असतात. व जेधे चौक ते सारसबाग दरम्यानचे बालाजी विश्वनाथ पथावर एकत्र जमत असतात. त्यावेळी वाहनचालकांची गैरसोय होऊ नये, सदर ठिकाणी वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे चालणे इष्ट आहे, याकरिता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, विजयकुमार मगर, पोलीस उप आयुक्त,वाहतुक पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, पोलीस यांची वाहने) खेरीज करुन स्वारगेट परिसरातील वाहतूकीत दिनांक-०१/०८/२०२३ रोजी ०७.०० वाजेपासून **आवश्यकतेनुसार** प्रमाणे खालीलप्रमाणे बदल करीत आहे.

| अ.क्र | बंद रस्ता | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १ | जेधे चौकातुन सारसबागकडे जाणेस प्रवेश बंद करणेत येत आहे. | १) सिंहगड रोडला जाण्यासाठी जेधे चौकाकडून सातारा रोडने सरळ होल्गा चौक - मित्रमंडळ चौक - सावरकर चौक मार्गे सिंहगड रोडला जावे.<br>२) सिंहगड रोडकडून स्वारगेटकडे जाण्यासाठी सावरकर चौक - मित्रमंडळ चौक - व्होल्गा चौक- जेधे चौक या मार्गाचा वापर करावा. |
| २ | जेधे चौकातील वायजंक्शन (फ्लॉयओव्हर)वरुन सारगबागेकडे वाहनांना जाणेस प्रवेश बंद करणेत येत आहे | कात्रजकडुन सारसबागेकडे जाणा-या वाहनचालकांनी ब्रीजवरुन न जाता लक्ष्मीनारायण(होल्गा चौक) चौकातुन डावीकडे वळुन इच्छित स्थळी जावे. |
| ३ | वेगासेंटर ते सारसबाग पर्यंत ग्रेडसेपरेटर मधून वाहनांना जाणेस प्रवेश बंद करण्यात येत आहे. | वेगासेंटर पासून घोरपडीपेठ उद्यान,राष्ट्रभुषण चौक पासून हिराबाग चौकाकडून इच्छित स्थळी जावे. |
| ४ | पुरम चौक ते जेधे चौक या रस्त्यावरील एकेरी मार्गात वाहनांना आवश्यकत्ता नुसार १५.०० ते २४.०० वा. पर्यंत शिथीलता देवुन दुहेरी प्रवेश देण्यात येईल. | |

सदर भागातील वाहतूकीची परिस्थिती नुसार तात्पुरत्या स्वरुपात आवश्यक ते बदल करण्यात येणार आहेत. तरी वाहनचालकांनी उपलब्ध पर्यायी मार्गांचा वापर करुन, वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

27.7.2023

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त,वाहतूक,
पुणे शहर.

**प्रत** :- १.जिल्हा प्रसिध्दी अधिकारी पुणे-१,स्थानिक वृत्तपत्रात बातमी स्वरुपात प्रसिध्दी देणेकामी.
२.सहाय्यक पोलीस आयुक्त,परिमंडळ-१,२,३,वाहतुक शाखा पुणे शहर
३.सर्व प्रभारी अधिकारी,वाहतुक शाखा पुणे शहर
४.वरिष्ठ पोलीस निरीक्षक,स्वारगेट,दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर

प्रत सस्नेह,
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा-१ पुणे शहर